पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ६७

सभावृत्तांत

दिनांक - २/०७/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २/०७/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
५) मा.जगदीश शेट्टी
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१०) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा. शिंदे – अति.आयुक्त, मा.गायकवाड,मा.कुलकर्णी,मा.टेकाळे, मा.दुरगुडे, मा.माछरे,मा.फुंदे - सहा. आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.डॉ.मनोज देशमुख – प्र वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.काची,मा.दुधेकर,मा.ढगे, मा.निकम, मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.कुलकर्णी,मा.सय्यद,मा.बरशेट्टी - कार्यकारी अभियंता, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधीक्षक,मा.देव – (एलबीटी) लेखाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक :- मा.चंद्रकांत वाळके                                   अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

लताताई शिवाजीराव पवार यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहुन मंगळवार दिनांक ०९/७/२०१३ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- मंगळवार दिनांक ९/७/२०१३ रोजी दु.२.४५ वाजेपर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ६७

सभावृत्तांत

(दिनांक २/७/२०१३ ची तहकुब सभा)

दिनांक - ९/०७/२०१३ वेळ - दुपारी २.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक २/७/२०१३ ची तहकुब सभा मंगळवार, दिनांक ९/०७/२०१३ रोजी दुपारी २.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.भालेकर अरुणा दिलीप
६) मा.वाघेरे सुनिता राजेश
७) मा.महेशदादा किसन लांडगे
८) मा.बारणे माया संतोष
९) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०) मा.कदम सदगुरु महादेव
११) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१२) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड,मा.कारचे,मा.कुलकर्णी,मा.ढेरे,मा.टेकाळे,मा.दुरगुडे,मा.फुंदे - सहा. आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक,मा.मोरे – प्र.नगरसचिव,मा.कांबळे – प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे –विकास अभियंता, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.डॉ.मनोज देशमुख – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.काची,मा.दुधेकर,मा.ढगे,मा.सवणे, मा.निकम, मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव,मा.थोरात,मा.साळवी,मा.खाबडे,मा.पिरजादे, मा.चिंचवडे, मा.कपिले, ,मा.सय्यद,मा.बरशेट्टी - कार्यकारी अभियंता,मा.कांबळे – प्र. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.साळुंके – मुख्य उद्यान अधीक्षक,मा.पोमण – संगणक अधिकारी,मा.गायकवाड – जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

मा.अरुणा भालेकर : मा.स्थायी समिती ठराव क्र.३५९० दिनांक २६/६/२०१३ मध्ये मान्यता देणेत येत आहे. " नंतर " तसेच पी.टी.गणवेश खरेदी करणेस (रंग बदलुन) व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजुरी देण्यात यावी. " हा मजकुर समाविष्ट करण्यात यावा.

मा.सभापती : मा.स्थायी समिती ठराव क्र.३५९० दिनांक २६/६/२०१३ मध्ये मान्यता देणेत येत आहे. " नंतर " तसेच पी.टी.गणवेश खरेदी करणेस (रंग बदलुन) व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजुरी देण्यात यावी. हा मजकुर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत येवुन त्या दुरुस्तीसह दिनांक २५/६/२०१३ व २६/६/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक - ६६ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ३६०९ विषय क्रमांक – १
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – अ प्रभाग
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/वि/कावि/जा/५६९/२०१३दि.१२/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

संतश्रेष्ठ जगतगुरू श्री.तुकाराम महाराज यांचे म.न.पा.शहारात स्वागत व मुक्कामी दरम्यान वारकर-यांना द्यावयाच्या सेवा सुविधा व सुरक्षा व्यवस्था करणे आवश्यक आहे. निगडी येथे दि.३०/०६/२०१३ रोजी संतश्रेष्ठ जगतगुरू श्री.तुकाराम महाराज पालखीचे सायंकाळी आगमान होणार असून त्यादिवशी आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात पालखीचा मुक्काम असणार आहे.सदरच्या कालावधी स्वागत कक्षाच्या ठिकाणी ध्वनीक्षेपण, प्रकाश व्यवस्था व वीजप्रवाह अखंडीत रहाणे करीता डि.जी.सेट तसेच आकुर्डी विठ्ठल मंदिराच्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था व डि.जी.सेट दोन्ही ठिकाणी सी.सी.टीव्ही.तात्पुरते भाडयाने घेणे,इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. वरील कामांची अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास अंदाजे र.रू.२,९४,१४९/-इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे कामे हे निविदा पुर्व स्विकृत दराप्रमाणे मे.विजय इलेक्ट्रिकल्स यांचेकडून निविदा नोटीस क्र.३/८५-२०१२-२०१३ चे मंजुर दर २१.२१%कमी प्रमाणे सदरचे कामी येणा-या खर्चास मंजुरी तसेच करारनामा करून पुर्व निविदा स्विकृत दराने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१० विषय क्रमांक – २
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/३२२/२०१३दि.२१/६/२०१३.

मा. विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१५/२०१२-१३ मधील अ.क्र.६ अन्वये, वॉर्ड क्र.६९ अंतर्गत जी.आय. ऑक्टोगोनल पोल उभारणी करून दिवाबत्ती व्यवस्थेचे नुतनीकरण

करणेकामी मे.व्ही.पी.जी.इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. (नि.र.रू.२३,८०,४७६/- (र.रू.तेवीस लाख ऐंशी हजार चारशे शहात्तर) पेक्षा ३६.५६ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६११ विषय क्रमांक – ३
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – स्थापत्य BSUP
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/BSUP/कावि/२२९/२०१३दि.२१/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.रामदास तांबे, उपशहर अभियंता याना,दिनांक १३/५/२०१३ व दिनांक २७/५/२०१३ रोजी कार्यालयीन कामकाजासाठी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली यांचे कार्यालयात उपस्थित रहाण्यासाठी झालेल्या विमान प्रवास खर्च अनुक्रमे र.रु २६१३७/-व र.रु.१९६७६/-असे एकुण ४५८१३/- रु.ची प्रतिपुर्ती करुन देण्यास तसेच त्याअनुषंगाने टॅक्सी प्रवासाचे बील व नियमानुसार दैनंदिन भत्ता अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१२ विषय क्रमांक – ४
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/५२/२०१३दि.२१/६/२०१३.

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२७.०५.२०१३ ते २.६.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/५२/२०१३ दि.२१.६.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१३ विषय क्रमांक – ५
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/५३/२०१३दि.२१/६/२०१३.

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३.०६.२०१३ ते ९.६.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/५३/२०१३ दि.२१.६.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१४ विषय क्रमांक – ६

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भः- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/५४/२०१३दि.२१/६/२०१३.

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१०.६.२०१३ ते १६.६.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/५४/२०१३ दि.२१.६.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१५ विषय क्रमांक – ७

दिनांक – ९/७/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भः- श्री.सुनील रामू धोत्रे, सफाई कामगार यांचा दिनांक ११/६/२०१३ चा अपिल अर्ज.

विषय क्रमांक ७ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षीत असल्याने तो प्राप्त झाल्यानंतरचे सभेचे वेळी विषय क्रमांक ७ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१६ विषय क्रमांक – ८

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३५८/२०१३दि.२४/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, अ व क प्रभागातील शुध्द पाणीपुरवठा पंपींग स्टेशन मधील पंपिंग मशिनरीची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.४७,६०,६२५/- [र.रू. सत्तेचाळीस लाख साठ हजार सहाशे पंचवीस] पेक्षा २५.२० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१७ विषय क्रमांक – ९

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३५९/२०१३दि.२४/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.६ अन्वये, मनपाच्या ड प्रभागातील थेरगांव, लक्ष्मणनगर, गावठाण, स.नं.९ वगळता उर्वरित शुध्द पाणी

पुरवठा करणा-या पंप हाऊस मधील पंपींग मशिनरीची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.२७,९८,८९८/- [र.रू.सत्तावीस लाख अठ्ठ्यान्नव हजार आठशे अठ्ठ्यान्नव] पेक्षा १६.३० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१८ विषय क्रमांक – १०
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३६१/२०१३दि.२४/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील ३.३ के.व्ही. क्षमतेचे इनडोअर व्ही.सी.बी.बदलणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.एस.टी. इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. (नि.र.रू.८१,२२,२१४/- [र.रू. एक्याऐंशी लाख बावीस हजार दोनशे चौदा] पेक्षा ४०.५० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६१९ विषय क्रमांक – ११
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/४१८/२०१३दि.१९/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असलेल्या वाय.सी.एम. रूग्णालयातील अस्थिरोग विभागामध्ये ऑर्थो सर्जरीसाठी आवश्यक लागणारे साहित्य खरेदी करणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई निविदा क्र. २४/२०११-१२ मधील प्राप्त लघुत्तम दरानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्रामधील मे.वैजयंती फार्मा बाब क्र.**24, 38, 39, 40, 68, 69** खरेदीकामी एकुण र.रू. ३८,०६६/- व मे. सर्जिसन यांचे बाब क्र. **5, 7, 9** ते **23, 27, 29** ते **37, 41** ते **49, 53, 58** ते 63, 65 ते 67, 70 ते 72, 76, 79 ते 83, 95, 96, 99 खरेदीकामी एकुण र.रू. ७,२६,१३९/- व मे. एलमेड यांचे बाब क्र. 3, 4, 25, 26, 28, 50 ते 52, 54 ते 57, 64, 73 ते 75, 77, 78, 84 ते 94, 97, 98 यांचे एकुण खरेदीकामी र.रू.९,२७,४५२/- नुसार करारनामा करून खरेदी करणेकामी येणा-या एकुण र.रू. १६,९१,६४७/- (अक्षरी र.रू. सोळा लाख एक्यान्नव हजार सहाशे सत्तेचाळीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२० विषय क्रमांक – १२
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/४१७/२०१३दि.१९/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांच्या दरांची तुलना केली असता कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांचे दर व कालावधी कमी आहे. यास्तव महाराष्ट्र

राज्य महानगरपालिका अधिनियम २०१३ मधील ५.२.२ अन्वये तसेच सदरची संस्था ही शासकीय संस्था असलेने करारनामा न करता वाय.सी.एम. रूग्णालयातील हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचे इव्हॅल्युएशन डिपार्टमेंट ऑफ इन्स्ट्रुमेंटेशन अँन्ड कंट्रोल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांचेमार्फत त्यांनी दिलेले एक महिना कालावधीसाठी र.रू.३,००,०००/- अधिक सर्व्हिस टॅक्स या दरास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२१ विषय क्रमांक – १३

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३६०/२०१३दि.२४/६/२०१३

विषय-निविदा नोटीस क्र.४/२ -१२/१३ मधील कामाचा करारनामा करणेस मंजुरीबाबत..

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२२ विषय क्रमांक – १४

दिनांक – ९/७/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भः- श्री.विनायक बाबुराव भोसले, रखवालदार यांचा दिनांक २४/६/२०१३ चा अपिल अर्ज

विषय क्रमांक १४ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षीत असल्याने तो प्राप्त झाल्यानंतरचे वेळी विषय क्रमांक १४ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२३ विषय क्रमांक – १५

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – पाणीपुरवठा व जलनिःसारण

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भः- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/५८७/२०१३दि.२४/६/२०१३

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र. ६/४२ / २०१२-१३ मधील अ.क्र.०५ अन्वये, जलक्षेत्र क्र.बी ८ अंतर्गत गुरूत्व वाहिनी वरील जुने एअर वॉल्व्ह बदलून नवीन एअर वॉल्व्ह टाकणेकामी मे.सातव कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.१३,०६,८५१/- (र.रू.तेरा लाख सहा हजार आठशे एक्कावन्न) पेक्षा २२.७७ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२४ विषय क्रमांक – १६
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/५८६/२०१३दि.२४/६/२०१३

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/ २०१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.जय इंजिनिअर्स (नि.र.रू.१३,०६,७९०/- (र.रू.तेरा लाख सहा हजार सातशे नव्वद) पेक्षा २६.२० **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२५ विषय क्रमांक – १७
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/५३८/२०१३दि.२५/६/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.८/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, चिंचवड मोरया गोसावी बी.पीटी. पासून चिंचवड एस.बी.आर. पर्यंत रायझिंग मेन टाकणेकामी मे.संजय कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.२,४३,६२,१२३/- (र.रू.दोन कोटी त्रेचाळीस लाख बासष्ट हजार एकशे तेवीस) पेक्षा ७.९९ **%** कमी) भाववाढ फरक कलमासह या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२६ विषय क्रमांक – १८
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/५३७/२०१३दि.२५/६/२०१३
विषय:- निविदा नोटीस क्र.५/११-१२-१३ मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरीबाबत..

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२७ विषय क्रमांक – १९
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/३६८/२०१३दि.२४/६/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-२०१३ मधील अ.क्र.१४ अन्वये, दुर्गादेवी उद्यान देखभाल करणेकामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४५,१२,१०८/- (र.रू.पंचेचाळीस लाख बारा हजार एकशे आठ) (प्रति वर्ष) पेक्षा ३६.६३ % कमी) यांचे दरानुसार सदर देखभालीचे कामकाज ३ वर्ष कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२८ विषय क्रमांक – २०

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/३७०/२०१३दि.२४/६/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-२०१३ मधील अ.क्र.९ अन्वये, भोसरी सहल केंद्र उद्यान देखभाल करणेकामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.५३,३८,७६४/- (र.रू. त्रेपन्न लाख अडोतीस हजार सातशे चौसष्ट) (प्रति वर्ष) पेक्षा ३६.५९ % कमी) यांचे दरानुसार सदर देखभालीचे कामकाज ३ वर्ष कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६२९ विषय क्रमांक – २१

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.वनिया तापकीर

संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/३६९/२०१३दि.२४/६/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-२०१३ मधील अ.क्र.१३ अन्वये, रस्ते सुशोभिकरण व देखभाल करणेकामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४४,९१,४०८/- (र.रू.चव्वेचाळीस लाख एक्यान्नव हजार चारशे आठ) (प्रति वर्ष) (३.४७०० प्रति चौ.मी.) दराने आलेली निविदा सर्वात कमी दराची असलेने सदर देखभालीचे कामकाज ३ वर्ष कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६३० विषय क्रमांक – २२

दिनांक – ९/७/२०१३ विभाग – संगणक

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/६/कावि/२४५/२०१३दि.२७/६/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस् ऑफ इंडिया हि केंद्र शासन अंगीकृत संस्था असल्याने केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दराने निविदा न मागविता थेट पध्दतीने दि. २८.०८.२०१२ चे

करारनामा अटी व शर्तीप्रमाणे कामकाज करणेस व दि. ०१.०७.२०१३ ते दि. ३१.१२.२०१३ या कालावधीत 24 MBPS (1:1) बँडविड्थ चार्जेस व ८ कार्यालये मुख्य कार्यालयाशी जोडणेकामी सहा महिने कालावधीकरीता मुदतवाढ व त्यासाठी येणारा एकूण र.रू. १२,०४,५००/- अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६३१ विषय क्रमांक – २३
दिनांक – ९/७/२०१३ विभाग – क प्रभाग विद्युत
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/कप्र/जा/५०६/२०१३दि.२०/६/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभाग विद्युत कार्यालयाकडील प्रस्तावानुसार कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथील दोन्ही लिफ्टचे दुरुस्तीचे काम उत्पादीत कंपनी मे.ओमेगा इलेव्हेटर्स यांचेकडुन निविदा न मागविता थेट पद्धतीने परंतु रितसर करारनामा करुन,करुन घेणेस व त्यापोटी
येणारा खर्च र. रू. ४१,२२०/- मे. ओमेगा इलेव्हेटर्स यांस आगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जगताप नवनाथ दत्तु )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/६४०/२०१३
दिनांक - ११/०७/२०१३.

सही/-
( जी. डी. मोरे )
**मुख्य लिपिक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.